**शासकीय व निम-शासकीय सेवेत आरक्षित पदांवर मागासवर्गीयांची भरती करण्याबाबत सरळ सेवा भरतीचा अनुशेष भरुन काढण्यासाठी खास प्रयत्न.**

---

**महाराष्ट्र शासन,**
सामान्य प्रशासन विभाग,
परिपत्रक क्रमांक बीसीसी-1089/प्र.क्र.229/89/16-ब,
मंत्रालय, मुंबई-400 032. दिनांक 11 ऑगस्ट, 1989.

**वाचा** :- समक्रमांकाचे शासन परिपत्रक, दिनांक 12 जुलै, 1989.

**परिपत्रक** :- शासनाने शासकीय व निम-शासकीय सेवेत, तसेच महामंडळे, मंडळे, इत्यादी सेवेमधील मागासवर्गीयांच्या आरक्षित पदांच्या संदर्भात, दिनांक 30 जून 1989 रोजीचा सरळ सेवा भरतीचा अनुशेष विशेष प्रयत्न करुन ठराविक मुदतीत भरुन काढण्याबाबत उपाययोजना करण्यासाठी सर्व नियुक्ती अधिका-यांना वरील परिपत्रकान्वये आदेश दिले आहेत. या अनुषंगाने अनुशेषाच्या पदांची संख्या कशी ठरवावी व त्याचप्रमाणे काही इतर मुद्दे उपस्थित करण्यात आले आहेत. या संदर्भात आता खालीलप्रमाणे खुलासा करण्यात येत आहे :-

(1) अनुशेष :- मागासवर्गीयांच्या विविध गटांसाठी सरळ सेवा भरतीने पदे भरताना 100 बिंदू नामावली शासनाने क्रमांक बीसीसी-1070/ईसीआर-जे, दिनांक 23 नोव्हेंबर, 1970 च्या आदेशान्वये विहित केली आहे. ही बिंदू नामावली वेळोवेळी पदे भरताना अखंडीतपणे वापरावयाची असते. सरळ सेवा भरतीची आरक्षित पदे न भरल्यास, ती बिगर आरक्षित ( deserved ) करुन पुढील 5 भरती वर्षापर्यंत अनुशेष म्हणून दाखवावी लागतात आणि तदनंतरच ती भरली नसल्यास, व्यपगत होतात. ज्यावर्षी एखाद्या संवर्गात सरळ सेवा प्रवेशाने पदे भरली जात नाहीत (किंवा एखाद्या वर्षी भरती करुन सुध्दा मागासवर्गीयांसाठी चुकीने आरक्षण ठेवले जात नाही) तेव्हा ते 5 भरती वर्षाच्या कालावधीसाठी मोजण्यात येऊ नये. यावरुन असे दिसून येईल की, शासन परिपत्रक, दिनांक 12 जुलै, 1989 मध्ये उल्लेखिलेल्या दिनांक 22 जून, 1989 रोजीचा अनुशेष हा त्या दिनांकापूर्वी झालेल्या शेवटच्या सरळ सेवा भरती नंतरचा पुढे नेण्यात आलेला अनुशेष (carried forward reserved vacancies) होय. पुढे असाही खुलासा करण्यात येत आहे की, आरक्षित पदांचा अनुशेष संवर्गातील एकूण पदांशी अथवा त्या संवर्गात यापूर्वी भरती झालेल्या मागासवर्गीय व्यक्तींच्या संख्येशी किंवा टक्केवारीशी निगडीत नाही. तसेच पदे मंजूर/रिक्त असूनही शुन्याधारित अर्थसंकल्प किंवा इतर प्रशासकीय कारणांमुळे जर भरतीची प्रक्रिया झाली नसेल तर, त्याबाबत आरक्षण किंवा अनुशेष उपलब्ध होणार नाही, कारण या दोन्ही बाबी प्रत्यक्ष भरतीशी निगडीत आहेत.

उपरोक्त शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, दिनांक 12 जुलै, 1989 मध्ये असा स्पष्ट खुलासा करण्यात आला आहे की, उपरोक्त अनुशेषाची पदे (आणि तेवढ्यापुरतीच) भरुन काढण्यासाठी वित्त विभागाच्या क्रमांक आरआय एस-1085/सीआर-27/अर्थसंकल्प-19, दिनांक 4 सप्टेंबर, 1986 मधील सरळ सेवा भरती बंधनाचे आदेश लागू राहणार नाहीत. अर्थात ही सवलत बिनराखीव (unreserved) पदे भरण्यासाठी उपलब्ध नाही आणि ती पदे भरावयाची असल्यास, शासनाची पूर्वमंजुरी घेणे आवश्यक राहील. त्याचप्रमाणे सतत सहा महिने रिक्त असलेली पदे भरण्याबाबत असलेले बंधनही उपरोक्त अनुशेष भरुन काढण्यासाठी लागू होणार नाही.

प्रत्येक नियुक्ती अधिका-याने दिनांक 30 जून, 1989 रोजीच्या अनुशेषाची मोजणी करताना वरील खुलासा विचारात घेऊन कार्यवाही करावी. याबाबत सोबतच्या विवरणपत्रात उदाहरणासह खुलासा केला आहे तो पहावा.

(2) पदे भरण्याची जाहिरात देणे :- शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, दिनांक 12 जुलै, 1989 उपपरि.(5)(ब) मध्ये सूचना दिल्या आहेत की, स्थानिक सेवायोजन कार्यालय, समाजकल्याण अधिकारी, इत्यादीकडून 15 दिवसांत जर कोणताही प्रतिसाद आली नाही तर, नियुक्ती अधिकारी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन अनुशेषाची पदे भरण्याची कार्यवाही करु शकतील. या संबंधात असा खुलासा करण्यात येतो की, अशा जाहिरातीन्वये राज्यातील इतर कोणत्याही सेवायोजन कार्यालयामध्ये किंवा समाजकल्याण अधिकारी, आदिवासी प्रकल्प/विकास अधिकारी, आदिवासी

विकास महामंडळ आणि संचालक, आदिवासी विकास, यांच्याकडे नोंदणी केलेल्या उमेदवारांकडून अर्ज मागविता येतील. परंतु अशा अर्जात त्या उमेदवारांनी त्यांचा संबंधित नोंदणी क्रमांक नमूद करणे आवश्यक राहील हा नोंदणी क्रमांक उमेदवाराला प्रत्यक्ष नियुक्ती देण्यापूर्वी तपासून पाहण्यात यावा.

अनुसूचित जमातींच्या उमेदवारांसाठी देण्यात येणा-या जाहिराती या शक्यतो राज्य स्तरावरील वर्तमानपत्राने आणि ज्या जिल्ह्यात आदिवासींची संख्या जास्त आहे, अशा जिल्ह्यातील वर्तमानपत्रात देण्यात याव्यात जेणेकरुन आदिवासी उमेदवारांकडून पुरेशा प्रमाणात प्रतिसाद मिळू शकेल.

(3) प्रादेशिक निवड मंडळामार्फत भरावयाची पदे :- शासकीय व निम-शासकीय सेवेत आरक्षित पदांवर सरळ सेवा भरतीचा उपरोक्त अनुशेष विहित कालावधीत भरुन काढण्यासाठी शासनाने शासन निर्णय, क्रमांक प्रानिम-2589/प्र.क्र.229/89/13-अ, दिनांक 5 ऑगस्ट, 1989 प्रमाणे स्पर्धा परीक्षा न घेता, केवळ मुलाखातीद्वारे निवड करण्याचे आदेश निर्गमित केले आहेत. याचीही नोंद घ्यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

दा. न. बैरट,
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

राज्यपाल यांचे सचिव,
मुख्यमंत्री यांचे सचिव,
सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे स्वीय सहायक,
सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
* प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ न्याय शाखा, मुंबई,
* प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,
* प्रबंधक, लोकायुक्त आणि उप लोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
सचिव, सर्व प्रादेशिक निवड मंडळे/सचिव, राज्य निवड मंडळ,
संचालक, समाजकल्याण, पुणे,
संचालक, सेवायोजन, मुंबई,
संचालक, आदिवासी विकास, नाशिक,
संचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे,
सर्व जिल्हा प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी प्रकल्प,
सर्व जिल्हा सेवायोजन अधिकारी,
सर्व जिल्हा समाजकल्याण अधिकारी,
सर्व मंत्रालयीन विभागांच्या अधिपत्याखालील इतर सर्व विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख.

* पत्राने.

एच-1492(ब)(5000-4-99)1अ

## विवरणपत्र (उदाहरण)

| सरळसेवा भरतीचे वर्ष | भरतीची पदे | | | 100 बिंदू नामावली (रोस्टर) प्रमाणे प्रत्येक प्रवर्गाच्या वाट्यास येणारी पदे - आरक्षण व अनुशेष धरुन. | | | | | प्रत्येक भरती वर्षाअखेर शिल्लक राहिलेल्या पुढे नेण्यात आलेल्या अनुशेषाच्या पदाचा तपशिल. | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | खुला प्रवर्ग | इ.मा.व. | अनुसूचित जाती | अनुसूचित जमाती | वि जा / भ.ज. | वर्ष | अनुसूचित जाती | अनुसूचित जमाती | वि जा / भ.ज. |
| 1. | 2. | | | 3. | 4. | 5. | 6. | 7. | 8. | | | |
| 1981 | 100 | अ) | मागील अनुशेष | -- | -- | *25 | *22 | *12 | 1980 | 5 | 10 | 4 |
| | | ब) | प्रवर्गवार वाटप | 66 | 10 | 13 | 7 | 4 | 1981 | 13 | 7 | 4 |
| | | क) | एकूण | 66 | 10 | 38 | 29 | 16 | | 18 | 17 | 8 |
| | | ड) | भरलेली पदे | 50 ≠ | 10 | 20 | 12 | 8 | * हा सर्वच्या सर्व अनुशेष 1980 भरती वर्षाचा आहे | | | |
| | | इ) | अनुशेष | -- | -- | 18 | 17 | 8 | ≠ उपलब्ध पदाचा 50% | | | |
| 1982 | 50 | अ) | | | | 18 | 17 | 8 | 1980 | -- | 3 | 1 |
| | | ब) | | 32 | 5 | 7 | 4 | 2 | 1981 | 8 | 7 | 4 |
| | | क) | | 32 | 5 | 25 | 21 | 10 | 1982 | 7 | 4 | 2 |
| | | ड) | | 25 ≠ | 5 | 10 | 7 | 3 | | 15 | 14 | 7 |
| | | इ) | | -- | -- | 15 | 14 | 7 | ≠ उपलब्ध पदांचा 50% | | | |
| 1983 | 30 | अ) | | -- | -- | 15 | 14 | 7 | 1980 | -- | 1 | 1 |
| | | ब) | | 20 | 3 | 3 | 2 | 2 | 1981 | -- | 7 | 4 |
| | | क) | | 20 | 3 | 18 | 16 | 9 | 1982 | 7 | 4 | 2 |
| | | ड) | | 15+2 * | 3 | 8 | 2 | -- | 1983 | 3 | 2 | 2 |
| | | इ) | | -- | -- | 10 | 14 | 9 | | 10 | 14 | 9 |
| | | | | | | | | | * बिगर आरक्षित केलेली 2 पदे | | | |

| 1. | 2. | | 3. | 4. | 5. | 6. | 7. | | 8. | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1984 | 20 | अ) | -- | -- | 10 | 14 | 9 | 1980 | -- | 1 | 1 |
| | | ब) | 10 | 2 | 3 | 5 | -- | 1981 | -- | 7 | 4 |
| | | क) | 10 | 2 | 13 | 19 | 9 | 1982 | -- | 4 | 2 |
| | | ड) | 10 | 2 | 8 | -- | -- | 1983 | 2 | 2 | 2 |
| | | इ) | -- | -- | 5 | 19 | 9 | 1984 | 3 | 5 | -- |
| | | | | | | | | | 5 | 19 | 9 |
| 1985 | 25 | अ) | -- | -- | 5 | 19 | 9 | 1980 | -- | × 1 | × 1 |
| | | ब) | 15 | 3 | 4 | 2 | 1 | 1981 | -- | 7 | 4 |
| | | क) | 15 | 3 | 9 | 21 | 10 | 1982 | -- | 4 | 2 |
| | | ड) | 10+2 * | 3 | 7 | -- | -- | 1983 | -- | 2 | 2 |
| | | इ) | -- | -- | 2 | 21 | 10 | 1984 | -- | 5 | -- |
| | | | * बिन्दर आरक्षित केलेली 2 पदे | | | | | 1985 | 2 | 2 | 1 |
| | | | | | | | | | 2 | 21 | 10 |
| | | | | | 1980 ची ही आरक्षित पदे व्यपगत झाली पुढे न्यावयाचा अनुशेष. | | | | -- | × -1 | × -1 |
| | | | | | | | | | 2 | 20 | 9 |
| 1986 | | भरतीची परवानगी नसल्यामुळे भरती नाही त्यामुळे आरक्षणाचा प्रश्न उद्भवत नाही. | | | | | | | | | |

| 1. | | | 2. | 3. | 4. | 5. | 6. | 7. | 8. | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1987 | 25 | अ) | -- | -- | 2 | 20 | 9 | वर्ष 1981 | -- | 3 | 2 |
| | | ब) | 17 | 2 | 3 | 2 | 1 | 1982 | -- | 4 | 2 |
| | | क) | 17 | 2 | 5 | 22 | 10 | 1983 | -- | 2 | 2 |
| | | ड) | 13 | 2 | 4 | 4 | 2 | 1984 | -- | 5 | -- |
| | | इ) | -- | -- | 1 | 18 | 8 | 1985 | -- | 2 | 1 |
| | | | | | | | | 1986 | या वर्षी भरती नव्हती. | | |
| | | | | | | | | 1987 | 1 | 2 | 1 |
| | | | | | | | | | 1 | 18 | 8 |
| | | | | | 1981 ची ही आरक्षित पदे व्यपगत झाली. | | | | -- | -3 | -2 |
| | | | | | पुढे न्यावयाचा अनुशेष. | | | | 1 | 15 | 6 |
| 1988 | 20 | अ) | -- | --- | 1 | 15 | 6 | 1982 | -- | *4 | *2 |
| | | ब) | 14 | 2 | 2 | 1 | 1 | 1983 | -- | 2 | 2 |
| | | क) | 14 | 2 | 3 | 16 | 7. | 1984 | -- | 5 | -- |
| | | ड) | 10 | 2 | 3 | 4 | 1 | 1985 | -- | 2 | 1 |
| | | इ) | -- | -- | -- | 12 | 6 | 1986 | या वर्षी भरती नव्हती. | | |
| | | | | | | | | 1987 | 1 | 2 | 1 |
| | | | | | | | | 1988 | -- | 1 | 1 |
| | | | | | | | *1982 ची ही आरक्षित पदे | | -- | 10 | 6 |
| | | | | | | | व्यवपगत झाली. | | -- | 2 | -1 |
| | | | | | | | | | 1 | 12 | 5 |

टीप :- (1) दिनांक 30 जून 1989 या पूर्वी सन 1988 ची भरती जर अखेरची असेल (म्हणजे सन 1989 मध्ये दिनांक 30 जून 1989 पूर्वी भरती झाली नसेल) तर वर दर्शविलेला सन 1988 चा अखेरचा अनुशेष हा दिनांक 30 जून 1989 च्या विशेष प्रयत्न करुन भरतीसाठी उपलब्ध असलेला अनुशेष राहील.

(2) दिनांक 30 जून 1989 चा अनुशेष 100 टक्के आरक्षण करुन भरता येईल. तसे भरण्यात वित्त विभागाचे दिनांक 4 सप्टेंबर 1986 च्या शासन निर्णय तरतुदीनुसार लागणारी शासनाची पूर्व मंजुरी आवश्यक नाही. तसेच सहा महिन्यापेक्षा रिक्त असणारी पदे भरण्यात असलेले बंधन लागू होणार नाही.

---